

**शा**ळेला लागणाऱ्या मूलभूत सुविधांसोबतच नोकरी करून येणाऱ्या मुलांना चांगल्या दर्जाचे अन्न देण्याची सोय मासूमने सुरू केली. त्याचबरोबर इंग्लीश स्पीकिंग कोर्सही राबविण्यात येतात. प्रयोगशाळांची अनुपलब्धता हा विद्यार्थ्यांच्या मार्गातला एक प्रमुख अडथळा आहे. वर्षभर त्यांना प्रयोगशाळेत प्रवेशच मिळत नाही. त्यांना या प्रयोगशाळा त्यांना वापरता याव्यात यासाठी 'मासूम'तर्फे मुख्यत्वे प्रयत्न केले जात आहेत.

व वॉशिंग्टनस्थित ग्लोबल फंड फॉर चिल्ड्रन या संस्थांची मदत मिळते. या सगळ्या प्रयत्नांबरोबरच रात्रशाळेतील विद्यार्थ्यांचा अभ्यास वर्गातल्या वर्गात व्हावा यासाठी प्रयत्न करणे, हादेखील 'मासूम'च्या अनेक उपक्रमांमधील एक उपक्रम आहे.

व्यसनाधिनता हा या विद्यार्थ्यांमधील एक मुख्य प्रश्न आहे. यामुळे शाळेतील अनुपस्थिती ही एक समस्या बनली आहे. मोठे विद्यार्थी समजुतीने शाळेत येतात. पण वयात येत असलेल्या विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी प्रवृत्त करणे, सातत्याने त्यांना समजावत राहणे ही शिक्षकांसाठी एक कसरतच असते. या सगळ्या समस्या, अडथळे जरी असले तरी काही सकारात्मक बाजूदेखील आहे. मिलिंद नाईट स्कूलमध्ये शिकवणाऱ्या रश्मी मोरे या शिक्षिकेने रात्रशाळांवर एक संशोधन केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे बहुतेक विद्यार्थ्यांचा रात्रशाळेकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. रात्रशाळेत जाणे म्हणजे कमीपणा न वाटता, हे आपल्या फायद्याचे आहे याची जाणीव त्यांना जाणीव झाली आहे. मुलींच्या संख्येत वाढ झाली आहे. पालकांचा दृष्टिकोनही बदलला आहे. आपल्या मुलींना रात्री शाळेत पाठवायला आता पालक विरोध करत नाहीत. मुली एकत्र येतात आणि एकत्र जातात.

रात्रशाळेतून बोर्डात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे त्या शाळेचे नाव उज्ज्वल होते. या मुलांचे कौतूक केले जाते. पण हे सगळे क्षणभंगूर ठरते. या क्षणिक कौतुकापेक्षा त्यांना कायमस्वरूपी पाठिंब्याची गरज आहे. ती द्यायला सरकार, समाज सगळेच अपुरे पडत आहेत. रात्रशाळांत शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांत जागरुकता कमी असते. त्यामुळे आपल्या पाल्याने शिकावे, मोठे व्हावे असे स्वप्न इतर कोणत्याही पालकांप्रमाणे त्यांनाही वाटत असले तरी त्यासाठी उपलब्ध पर्यायांची मात्र त्यांना माहिती नसते. अनेक मुलं आपला मित्र जातो म्हणून आपणही जाऊ या अशा विचाराने इथे प्रवेश घेतात व अधुरे स्वप्न पूर्ण करण्याच्या ध्यासानिशी कष्ट करतात.

ही सगळी परिस्थिती लक्षात घेता परावलंबित्वातून रात्रशाळांची सुटका होऊन स्वाभिमानाने त्या कधी उभ्या राहतील हा प्रश्न आहे.

namita.deshpande@expressindia.com